पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,चव्हाण नगर,पाषाण रोड, पुणे - ४११ ००८

दुरध्वनी क्रमांक ०२०-२५६५७८७८ फॅक्स क्र.०२०-२५६७४६४१
ई मेल - sp.pune.r @mahapolice.gov.in

**अतितात्काळ/ कालमर्यादा.**

जा.क्र.पोअ पुणे(ग्रा)/२०१८ १५७४८
दिनांक-२४/०७/२०१८

प्रति,

उप संचालक,
माहिती विभागीय माहिती कार्यालय,
पुणे-४११ ००१.

**विषय :- जाहीरात प्रसिध्दीबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयासअनुसरुन कळविण्यात येते की,पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे कार्यालय, अप्पर पोलीस अधिक्षक, बारामती विभाग यांचे कार्यालय, ८ उपविभागिय अधिकारी कार्यालये व ३६ पोलीस स्टेशन मधील आवक जावक प्रणाली ऑनलाईन करणेकरीता संगणक व प्रिंटर यांचा एकुण ४६ नग पुरवठा करणेबाबत इच्छुक व अधिकृत मान्यताप्राप्त पुरवठा धारकांकडुन दोन लिफ़ाफ़ा पध्दतीने सिलबंद ई-निविदा मागविण्यात येत आहेत..

सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षा करिता सिलबंद निविदा मार्गाविण्यात येत आहेत. अधिकृत ईच्छूक पुरवठादारांकडून स्वतंत्ररित्या तांत्रिक व व्यावसायीक सिलबंद ई-निवीदा मागविण्यात येत आहेत. सोबत जाहीरातीचा नमुना जोडला आहे. निवीदा ई-टेंडर पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तरी सदरची निवीदा मागविण्याबाबतची जाहीरात शासकीय दराने दोा वर्तमानपत्रात पुणे शहर व जिल्हा आवृतीमध्ये दिनांक ६/८/२०१८ रोजीचे अंकात ०१ दिवस प्रसिध्द करण्यात यावी हि विनंती.

आपला विश्वासू,

पोलीस अधिक्षक )
यांचे मान्यतेने )

(अनिल लंभाते ).
पोलीस उप अधिक्षक, मुख्यालय,
पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांचेकरिता

प्रत :-

स.पो.नि. सायबर सेल, पुणे ग्रामीण.
२/- सदर इ टेंडर नोटीस / जाहिरात पुणे ग्रामीण पोलीस दलाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी.

Noted
PC Bharat / Give
Rem N A.
/7/2018

## जाहिर ई- निविदा

पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे कार्यालय, अप्पर पोलीस अधिक्षक, बारामती विभाग यांचे कार्यालय, ८ उपविभागिय अधिकारी कार्यालये व ३६ पोलीस स्टेशन मधील आवक जावक प्रणाली ऑनलाईन करणेकरीता संगणक व प्रिंटर यांचा एकुण ४६ नग पुरवठा करणेबाबत इच्छुक व अधिकृत मान्यताप्राप्त पुरवठा धारकांकडुन दोन लिफ़ाफ़ा पध्दतीने सिलबंद ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा E-Tender पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर रु. १,०००/- online भरणा करुन दि. ७/०७/२०१८ ते २९/०७/२०१८ पर्यंत download करता येतील. निविदा कराराची संपुर्ण माहीती व अटी शर्ती www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर तसेच www.puneruralpolice.gov.in या वेबसाईटवर पाहण्यास उपलब्ध आहेत.

पुणे
दिनांक :- /०७/२०१८

(मो. सुवेझ हक)
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण

**पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,**

चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे - ४११ ००८

दुरध्वनी क्रमांक ०२०-२५६५७८७८ फॅक्स क्र.०२०-२५६७४६४१

ई मेल - sp.pune.r@mahapolice.gov.in


---

जा.क्रं. पोआपुणे(ग्रा)/नोंशा/निविदा चौकशी/संगणक/२०१८ दिनांक

## निविदा सुचना

**विषय - पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, पुणे यांचे यांचे कार्यालय, अप्पर पोलीस अधिक्षक, बारामती विभाग यांचे कार्यालय, ८ उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालये व ३६ पोलीस स्टेशन मधील आवक, जावक प्रणाली ऑनलाईन करणे करीता संगणक व प्रिंटर यांचा प्रत्येकी अंदाजे ४६ नग पुरवठा करणेबाबत इच्छुक व अधिकृत मान्यताप्राप्त पुरवठा धारकांकडून दोन लिफ़ाफ़ा पध्दतीने सिलबंद ई-निविदा मागविण्यात येत आहेत.**

पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण हे महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांचे कार्यालय, अप्पर पोलीस अधिक्षक, बारामती विभाग यांचे कार्यालय, ८ उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालये व ३६ पोलीस स्टेशन करीता दोन लिफ़ाफ़ा ई-टेंडर पध्दतीने खाली विहीत केलेल्या अटी व शर्तींना अधिन राहुन नोंदणीकृत व मान्यताप्राप्त व्यावसायिक कंपन्यांकडुन सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

अ) **कार्यक्षेत्र**

१. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण कार्यालय व त्यांचे अधिपत्याखालील सर्व शाखा, मुख़्यालय येत आहे.
२. पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण कार्यालय
३. अप्पर पोलीस अधिक्षक पुणे विभाग व बारामती विभाग कार्यालय
४. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय -
   हवेली, खेड, बारामती, दौंड, लोणावळा, देहुरोड, जुन्नर, भोर
५. पोलीस स्टेशन -
   हवेली, देहुरोड, लोणी काळभोर, तळेगाव दाभाडे, यवत दौंड, शिक्रापुर, शिरुर, बारामती शहर, बारामती तालुका, वडगाव निंबाळकर, सासवड, जेजुरी, चाकण, खेड, मंचर, नारायणगाव, जुन्नर, लोणावळा शहर, लोणावळा ग्रामीण, भोर, इंदापुर, पौड, घोडेगाव, वडगाव मावळ, वेल्हा, वालचंदनगर, ओतुर, राजगड, लोणीकंद, आळंदी, आळेफ़ाटा, भिगवण, तळेगाव एम.आय.डी.सी., रांजणगाव व कामशेत टाकवी.

ब) **कामाची व्याप्ती (Scope of Work)-**

१. खालील परीशिष्ठामध्ये दिलेल्या Specification प्रमाणे संगणक व प्रिंटर यांचा पुरवठा पोलीस अधिक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण यांच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणी, उपविभागिय अधिकारी कार्यालये यांना त्यांच्या ठीकाणी जाऊन करावा लागेल. पुरविलेल्या वस्तुंचे Installation वस्तु ज्या ठीकाणी पुरविल्या असतील अशा ठीकाणी समक्ष जाऊन करावे लागेल. तसेच पुरविलेल्या वस्तुंचा demo त्याठीकाणी असणा-या वापरकर्त्यांना द्यावा लागेल.

क) निविदेच्या मुख्य अटी व शर्ती -

१. निविदाधारकाने पुरवठा आदेश मिळाल्यानंतर १५ दिवसांचे आत आदेशामधील नमुद वस्तु आदेशामध्ये नमुद केलेल्या पोलीस ठाणी व उपविभागिय अधिकारी कार्यालये यांच्याकडे समक्ष जाऊन पुरविण्यात याव्यात.

२. निविदाधारकाने पुरवठा आदेशामध्ये नमुद केल्यानुसार संगणक व प्रिंटर संबंधित पोलीस ठाणे, उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालये यामध्ये संबंधितांच्या पत्त्यावर समक्ष जाऊन पुरवावे लागतील. तसेच संगणक व प्रिंटर यांचे Installation व Demo संबंधित पोलीस ठाणी व उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालये यांचे कडे करुन त्याचा Satisfactory Installation Report संबंधित ठाणे प्रभारी कींवा सक्षम अधिकारी यांचे सहीनिशी पोलीस अधिक्षक यांचे कार्यालयामध्ये सादर करावा लागेल. Installation Report सादर केल्याशिवाय देयक अदा केले जाणार नाही.

३. पोलीस अधिक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयाच्या अंतर्गत येणारे सर्व पोलीस ठाणी, उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालये हे कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असतात. याकरीता पुरवठादार यांनी Gurantee / Warranty कालावधीमध्ये २४ तास व ३६५ दिवस प्रत्येक पोलीस ठाण्यांच्या ठीकाणी सेवा पुरविणे बंधनकारक आहे. कार्यालयीन कामकाजाचे दिवस व वेळ आणि ठीकाण अशी सबब चालणार नाही.

४. योग्य वेळेत व तात्काळ सेवा मिळण्यासाठी निविदा भरणारी संस्था ही पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कींवा पुणे जिल्हामधील इतर नगपालिका यांच्या हद्दीमधील नोंदणीकृत असावी.

५. पुरविण्यात आलेल्या वस्तुंच्या Gurantee / Warranty बाबत या कार्यालयाकडे रु. १०० च्या मुद्रांकावर Onsite सेवा पुरविण्यासंदर्भात प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल तसेच सदरच्या वस्तुंच्या पुरवठ्या विषयी रु. ५०० च्या मुंद्राकावर करार करावा लागेल.

६. पुरवठा आदेश मिळालेल्या कंपनीला / फ़र्मला पुरवठा आदेशाच्या ५% रक्कम अनामत रक्कम म्हणुन या कार्यालयाकडे राष्ट्रीयकृत बॅकेची Bank Gurantee कींवा धनाकर्ष (Demand Draft) या स्वरुपात जमा करावी लागेल. पुरविण्यात आलेल्या वस्तुंची सेवा कालावधी विनातक्रार संपल्यानंतर अनामत रक्कम परत केली जाईल. सेवा कालावधीमध्ये सेवा समाधानकारक न दिल्यास अनामत रक्कम जप्त केली जाईल याची नोंद घ्यावी.

७. निविदा धारकाने वस्तुंची दर देताना ते बाजारभावाने देणे अपे क्षित आहे. बाजारभावापेक्षा अत्यंत कमी कींवा अत्यंत जास्त दराची निविदा स्विकारली जाणार नाही. तसेच कोणत्याही वस्तुंचे दर हे त्याच्या कमाल किरकोळ रक्कमेपेक्षा (MRP) कोणत्याही परिस्थितीमध्ये जास्त असु नयेत. तसेच सदर वस्तुंचे दर हे शासनाच्या GEM Portal (Government E-Market) पेक्षा कमी असावेत.

८. पुरविण्यात आलेल्या वस्तुंविषयी कोणतीही तक्रार आल्यास सदर वस्तु ज्याठीकाणी पुरविल्या आहेत त्या ठीकाणी समक्ष जाऊन त्याची दुरुस्ती करावी लागेल त्यासाठी कोणताही अतिरिक्त चार्ज देण्यात येणार नाही.

९. पुरविण्यात आलेल्या वस्तुंची Gurantee / Warranty त्या वस्तु ज्याठीकाणी पुरविण्यात आलेल्या आहेत अशा ठीकाणी जाऊन **(Onsite)** पुर्ण करावी लागेल.

१०. संगणकाच्या Gurantee / Warranty च्या कालावधीमध्ये Software च्या विषयी तक्रार आल्यास त्याची सेवा सुध्दा Onsite पध्दतीने द्यावी लागेल. त्यासाठी कोणताही अतिरिक्त चार्ज देण्यात येणार नाही.

११. Gurantee / Warranty कालावधीमध्ये पुरविण्यात आलेली वस्तु बंद पडल्यास ती तात्काळ २४ तासांचे आत दुरुस्त करुन देणे बंधनकारक राहील. सदर वस्तु दुरुस्त होण्यास २४ तासांपेक्षा जास्त कालावधी लागणार असल्यास त्यावस्तुच्या ऐवजी दुसरी आपाती वस्तु (Standby) द्यावी लागेल. त्याचा कोणताही अतिरिक्त चार्ज देण्यात येणार नाही.

१२. या निविदेतील कोणतीही अट रद्द करण्याचा / शिथील करण्याचा कींवा संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अथवा पुढे ढकलण्या संपुर्ण अधिकार मा. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामिण यांनी राखुन ठेवला आहे.

१३. अपात्र निविदाकारांची बयाना रक्कम, सर्व प्रक्रिया पुर्ण झालेनंतर online पध्दतीने परत करण्यात येईल.

१४. निविदेसंदर्भातील सर्व निर्णय मा. पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण हे घेतील व ते सर्व निविदाकारांवर बंधनकारक असतील.

१५. कोणतीही निविदा मंजुर अथवा नामंजुर करण्याचा हक्क तसेच कोणतेही कारण न देता सदर निविदा सुचना पुढे ढकलणे कींवा रद्द करणे याचे अधिकार मा. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच अशा मंजुर कींवा नामंजुर निविदे बाबत कोणतेही स्पष्टीकरण मा. पोलीस अधिक्षक हे निविदाकारांना देणार नाहीत.

१६. निविदा मंजुर करताना एकवट पध्दतीने एकाच निविदाकाराला काम देण्यात येईल. त्यासाठी संगणक व प्रिंटर यांचे प्रत्येकी दर गृहीत न धरता एकुण रकमेचा विचार केला जाईल.

१७. वेगवेगळ्या Model / Brand च्या निविदा प्राप्त झाल्यास आणि त्याचा तुलनात्म दर तक्ता बनविताना काही अडचणी आल्यास सर्व या कार्यालयाची तांत्रिक समिती जे Model / Brand यांची शिफ़ारस करेल त्याच Model / Brand च्या वस्तु खरेदी करण्यात येतील त्यासाठी न्युनतम दर हा एकमेव पर्याय असणार नाही. या संदर्भात मा. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांना निर्णय घेण्याचे सर्व अधिकार राहतील. त्यासंदर्भात कोणतीही तक्रार चालणार नाही.

**१८. ज्या निविदाकारांना Model / Brand यासंदर्भात काही चर्चा करायची असेल त्यांनी निविदापुर्व बैठकीला (Pre Bid Meeting) उपस्थित राहुन त्यांना हव्यात्या Model / Brand यांचा Demo सादर करावा. निविदापुर्व बैठकीला अनुपस्थित राहणा-या निविदाकाराला निविदेसंदर्भात तक्रार करण्याचा कोणताही हक्क असणार नाही. ही या निविदेची मुख्य अट असेल.**

१९. या कार्यालयाच्या फ़ायद्यासाठी न्युनतम दर असणा-या निविदाकारांशी चर्चा करुन त्यांचेबरोबर negotiation करण्याचे हक्क या कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

२०. निविदा सुचनेमध्ये नमुद केलेली वस्तुंची संख्या कमी कींवा जास्त होऊ शकते. वस्तुंची संख्या कमी कींवा जास्त झाली तरी निविदाधारकाने दिलेल्या दरांमध्ये सदर वस्तु पुरविणे बंधनकारक राहील; तसेच निविदेमध्ये सामाविष्ठ असणा-या वस्तुंची १ वर्षापर्यंत गरज लागल्यास निविदेतील दरानुसारच संपुर्ण वर्षभर पुरवठा करावा लागेल.

२१. निविदेमधील सर्व दर हे सर्व करांसह असावेत. तसेच सदर वस्तुंचे Installation साठी तसेच जाणे येणेसाठी वेगळे शुल्क लावता येणार नाही.

२२. निविदाधारकाला देय रक्कमे मधुन शासनाच्या नियमाने २% (कींवा लागु असेल त्याप्रमाणे) आयकर (TDS) कपाती करण्यात येईल.

ड) **निविदा दाखल करण्याची पध्दत -**

१. सदर निविदा ही online पध्दतीने e-tender द्वारा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर २ लिफ़िफ़ा पध्दतीने भराव्यात. तसेच सदर निविदा www.puneruralpolice.gov.in या वेब पोर्टल वर फ़क्त download करण्यासाठी उपलब्ध आहे. सदर निविदा रु. १,०००/- (विना परतावा) चा भरणा online करुन download कराव्यात. रु. १,०००/- चा भरणा न करता भरलेल्या निविदा पात्र ठरणार नाहीत.

२. **लिफ़ाफ़ा क्रं. १ मध्ये तांत्रिक** माहीती खालील प्रमाणे देण्यात यावी -

**निविदा कारांनी सोबत जोडायची कागदपत्रे**

a. निविदाकार कंपनीचे पुर्ण नाव व पत्ता दुरध्वनी सह
b. निविदाकार कंपनीचे मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे पुर्ण नाव व पत्ते दुरध्वनीसह
c. निविदाकार कंपनीचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (Company incorporation / Shop Act) (पुणे जिल्हामध्ये Registered Office असणे बंधनकारक आहे.)
d. निविदाकार कंपनीचे / मालकाचे PAN Card / TAN Card.
e. निविदाकार कंपनीचे मागील ३ वर्षांचे Income Tax Return.
f. निविदाकार कंपनीचे GST Registration Certificate.
g. संगणक व प्रिंटर्स च्या पुरवठ्याचे शासकीय व निमशासकीय संस्थेमध्ये काम केले बाबतचे कागदपत्रे. (सोबत work order / Purchase Order जोडणे बंधनकारक)
h. निविदाकार कंपनी ज्या make चे संगणक व प्रिंटर पुरविणार आहेत त्या कंपनीचे Authorization Letter सदर manufacturing कंपनीच्या Letter Head वर देणे बंधनकारक आहे. तसेच सदर Authorization Letter मध्ये वस्तुच्या warranty / guaranty ची सर्व माहीती सदर कंपनीच्या Letter Head वर देणे बंधनकारक आहे.
i. पुरविण्यात येणारे संगणक हे Branded असावेत. तसेच असे संगणक सिलबंद पुरविण्यात यावेत. त्यातील सर्व स्पेअर पार्ट हे पुरवठादार कंपनीचेच (manufacturing company) चेच असावेत. सदर संगणक सिलबंद नसतील तर असे संगणक स्विकारले जाणार नाहीत. तसेच सदर संगणक सिलबंद पुरविलेबाबतचे प्रमाणपत्र पुरवठादार कंपनीचे Letter head वर देणे बंधनकारक आहे.
j. पुणे ग्रामीण पोलीस कार्यालयाचे अधिपत्याखाली असलेले सर्व पोलीस ठाणी यांना सदर संगणक व प्रिंटर त्यांच्या ठीकाणी पुरवुन तेथे संपुर्ण installation करावे लागेल तसेच सदर वस्तुंची warranty संबंधित ठीकाणी जाऊन पुर्ण करावी लागेल. तशा प्रकारचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक

आहे. (निविदा भरतेवेळी रु. १००च्या मुद्रांकावर Onsite Warranty देणार असे प्रतिज्ञापत्र जोडावे.) (परिशिष्ट - ३ प्रमाणे)

k. निविदाकार कंपनीचे एकुण Technical Manpower संबंधी माहीती देणे बंधनकारक आहे. (किमान ५ Technical कामगार असलेबाबत).

l. निविदाकार कंपनी किंवा त्यांचे मालक व मालकाचे जवळचे नातेवाईक यांच्यावर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फ़सवणुकीची / गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालु / प्रलंबित नसली पाहीजे. तसेच निविदाकार कंपनीचा समावेश सरकारी काळ्या यादीत नसला पाहीजे. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र रु. १०० च्या स्टॅम्प पेपर वर देणे बंधनकारक आहे. (परिशिष्ट - २ प्रमाणे)

m. निविदा बयाना रक्कम रु. १०,०००/- चा online भरणा केल्याची पावती (Transaction ID / Online Receipt) जोडणे बंधनकारक आहे. (EMD Exemption Not Allowed)

२. **लिफ़ाफ़ा क्रं. २ व्यावसायिक** मध्ये खालील प्रमाणे दर देण्यात यावेत -

१. सदर दर हे कंपनीच्या Letter Head वर छापील स्वरुपात सही व शिक्क्यानिशी देण्यात यावेत, एका फ़र्म कडुन जास्तीत जास्त प्रत्येकी २ प्रकारच्या कंपनीचे दर असावेत.) उदा. २ Brand किंवा specification चे वेगवेगळे Computer / Printer)

२. वस्तुंचे दर देताना प्रति नग या पध्दतीने द्यावेत. तसेच सर्व दर हे सर्व करांसहीत व पोहोच भाड्यासह (Onsite Delivery) स्वरुपात असावेत.

| अक्रं. | वस्तुंचे स्वरुप व विवरण | प्रति नग दर<br>(अंकी व अक्षरी) |
|---|---|---|

**नोट** - देण्यात येणारे दर हे सर्व करांसह असावेत.

**परिशिष्ठ - १ (Specification)**

a. **Branded Desktop Specification -**

**Make Dell / HP / Lenovo / Acer / Asus or Similar**

| Processor | Operating System | RAM | Hard Disk | Warranty |
|---|---|---|---|---|
| Intel Pentium Dual Core Or Higher | Microsoft Windows १० Home | ४ GB RAM Or Higher | ५०० GB Or Higher | Minimum ३ Years |

**Note - Other Standard Specifications as per Company should be mentioned.**

b. **Printer Specification**

**Make HP Laserjet MFP ११३६ / Canon**

| Type | Print Speed | Duplex | Wi-Fi | Warranty |
|---|---|---|---|---|
| All In One Laser Printer | १८ PPM or Higher | No | No | १ Year or Higher |
| Printer Epson DMP ८० Col २४ Pin | Standard | Standard | No | १ Year |

**Note** - Printer Toner should be refillable.

**परिशिष्ट - २ (मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)**

**प्रतिज्ञापत्र (रु. १०० च्या मुद्रांकावर)**

मी / आम्ही ------------(मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता)------------------------------------ पुणे ग्रामिण पोलीस अधिक्षक कार्यालयामध्ये संगणक व प्रिंटर्स च्या सेवा संविदा कराराची निविदा भरत या ---------------(निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ------------ नावाने भरत आहोत. मी / आम्ही तसेच माझी कंपनी यांचे विरोधात कोणत्याही सरकारी कार्यालयामध्ये निविदा भरण्याच्या दिनांका रोजी पर्यंत कोणतीही गैरप्रकार, अफ़रातफ़र, गैरव्यवहार, फ़सवणुक तसेच भ्रष्टाचार या विषयी कोणतीही चौकशी चालु नाही किंवा प्रलंबित नाही. तसेच अशा प्रकारची कोणतीही चौकशी माझे / आमचे जवळचे नातेवाईक (आई / वडील / बायको / नवरा / भाऊ / बहीण) यांचे विरोधात सुध्दा चालु नाही.

**सही**

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक

**परिशिष्ट - ३ (मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)**

**प्रतिज्ञापत्र (रु. १०० च्या मुद्रांकावर)**

मी / आम्ही ------------(मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता)------------------------------------ पुणे ग्रामिण पोलीस अधिक्षक कार्यालयामध्ये संगणक व प्रिंटर्स च्या पुरवठ्याची निविदा या ---------------(निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ------------ नावाने भरत आहोत. निविदेमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संगणक व प्रिंटर याचा पुरवठा व सेवा Warranty / Guaranty कालावधीमध्ये संबंधित पोलीस ठाणी / उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालये यांच्या कडे Onsite पध्दतीने २४ तास ३६५ दिवस देऊ.

तसेच आम्ही खाली सही करणार निविदा कालावधीमध्ये संगणक व प्रिंटर यांच्या Software ची सेवा Onsite पध्दतीने २४ तास ३६५ दिवस संबंधित ठीकाणी समक्ष जाऊन पुर्ण करु. त्यासाठी कोणतीही अंतराची व वेळेची सबब देणार नाही.

**सही**

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक

**इ) निविदा दाखल करणे / निविदा उघडणे याबाबतचा तपशील -**

| | | |
|---|---|---|
| १. | निविदा मागविण्याचा दिनांक | दिनांक ७/०६/२०१८ ते 29/०६/२०१८ |
| २. | निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक /०७/२०१८ 29/6/2018 संध्या १६.०० वाजे पर्यंत www.maharashtrateder.gov.in या website वर online पध्दतीने सादर कराव्यात. |
| ३. | निविदा पुर्व बैठक | दिनांक १४/०६/२०१८ संध्या १५.०० वाजता मा. पोलीस |

| | | |
|---|---|---|
| | (Pre Bid Meeting) | अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयात होईल. |
| ३. | निविदा उघडण्या दिनांक व वेळ | **तांत्रिक निविदा** - दिनांक 23/०6/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता हजर निविदाकार यांचे प्रतिनिधींसमोर online उघडण्यात येतील.<br>**व्यावसायिक निवीदा** - ज्या निविदाकारांच्या तांत्रिक निविदा मंजुर होतील, अशा निविदाकारांना व्यावसायिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ कळविली जाईल.<br>(दोन्ही निविदा online पध्दतीने उघडण्यात येतील.) |
| ४. | संपर्क अधिकारी | श्रीमती एस. एस. सावंत, व.श्रे. लिपिक लिपिक नोंदणी शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय, पुणे ग्रामिण पोलीस, चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे - ८<br>दुरध्वनी क्रं. ९९२२१६५००६ |

प्रस्तावित संगणक व प्रिंटर खरेदी निविदेसंबंधी काही शंका असल्यास त्याच्या निराकरणासाठी पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयात उपरोक्त नमुद केलेल्या संपर्क अधिकारी यांचेशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा. तसेच E-Tender विषयी काही शंका असल्यास एनआयसीच्या १८००३०७०२२३२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

**ई-निविदा पध्दतीने निविदा भरताना काही अडचणी आल्यास (Internet सेवा बंद असणे / लाईट जाणे ई.) व त्यामुळे अपुर्ण निविदा भरली गेल्यास त्याला हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच अशा प्रकारच्या कोणत्याही समस्या निर्माण झाल्यास त्याची कोणतीही दखल घेतली जाणार नाही याची सर्व निविदाकारांनी नोंद घ्यावी.**

**लखोटा क्रं. १ (तांत्रिक) उघडण्याबाबत -**

लखोटा क्रं. १ (तांत्रिक) हा दिनांक ३०/१०/२०१५ च्या उद्योग व उर्जा विभागाकडील शासन निर्णयातील सुचने नुसार गठीत केलेल्या समितीसमोर E-Tender प्रणाली मार्फत उघडण्यात येईल. तसेच त्यासाठी निविदाकारांना आमंत्रित केले जाईल. निविदाकार स्वतः कींवा त्यांचे प्रतिनिधी सदर वेळी उपस्थित राहु शकतात. सदर ई-निविदा तांत्रिक अडचणींमुळे निविदाकार यांच्या समोर उघड्ण्यात येतीलच असे काही नाही. यंत्रणेच्या उपलब्धतेनुसार पोलीस अधिक्षक कार्यालयामध्ये कींवा राष्ट्रीय सुचना केंद्र (NIC) या ठीकाणी उघडल्या जातील. त्यासंदर्भात कोणतीही तक्रार चालणार नाही. जे निविदाकार उपस्थित राहणार नाहीत त्यांना सदर प्रक्रियेमध्ये कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच लखोटा क्रं१ (तांत्रिक) मधील सर्व कागदपत्रांची तपासणी समितीमार्फत केली जाईल. त्यासाठी गरज लागल्यास जास्तीचा वेळ मागुन घेंण्यात येईल. कागदपत्रांची तपासणी निविदाकारांसमोरच करण्याचे बंधन समितीवर नसेल. समितीच्या वेळेनुसार व गरजेनुसार कागदपत्रांची छानणी व तपासणी केली जाईल तसेच त्याबाबतीत अंतिम निर्णय हे मा. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण हे समिती चे अध्यक्ष या नात्याने घेतील व तो निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल. समितीचा निर्णय यथावकाश सर्व निविदा धारकांना कळविण्यात येईल.

**नोट - सदर पोलीस अधिक्षक कार्यालय हे कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे निविदा उघडणेची दिलेली तारीख व वेळ कधीही बदलु शकते याची नोंद घ्यावी.**

**निविदेचा वैधता कालावधी -**

निविदेचा वैधता कालावधी तांत्रिक लिफ़ाफ़ा उघडल्यानंतर किमान १२० दिवस असेल. १२० दिवसांपेक्षा कमी कालवधी दर्शविलेल्या निविदा नाकारण्यात येतील.

**निविदा प्रक्रियेबाबत अथवा निविदा सादर केलेल्या निविदाधारकांबाबत तक्रारीबाबत -**

निविदा प्रक्रियेमध्ये निविदा सादर केलेल्या निविदाधारकावर तक्रार दाखल करणा-या तक्रारधारकास रु. ५०,०००/- इतकी अनामत रक्कम कार्यालयाकडे जमा करावी लागेल. जर तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास संबंधीत तक्रारदाराची अनामत रक्कम परत करुन आरोप सिध्द झालेल्या निविदाधारकास निविदा प्रक्रियेमधुन वगळण्यात येऊन त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. ( उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/उद्योग-४ दिनांक १ डिसेंबर २०१८ मधील ५.८.२ नुसार पा.क्र. ७६)

**निविदेचे मुल्यमापन -**

१. गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फ़त तांत्रिक लखोट्यातील कागदपत्रांची तपासणी केली जाईल.
२. निविदाधारकाचे पात्रतेचे सर्व निकष, निविदाधारकाची ऐपत, निविदा कालावधी पुर्ण करण्याची क्षमता याबाबतची छाननी निविदा धारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे समिती ठरवेल.
३. सदर निविदेचे मुल्यमापन करताना केवळ कमी दर हा निकष लागणार नाही. सक्षम व पुर्व इतिहास लक्षात घेतला जाईल.
४. सदर निविदा देतेवेळी जिल्हा स्तरावर काम केलेल्या निविदाधारकास प्राधान्य देण्यात येईल.

**भ्रष्ट, फ़सवणुक अथवा अव्यवहार्य सेवेबाबत -**

भ्रष्ट, फ़सवणुक अथवा अव्यवहार्य सेवा असणा-या तसेच उपरोक्त असलेले व सदरची माहीती या कार्यालयापासुन लपवुन ठेवलेल्याचे निदर्शनास आलेस सदर निविदाकाराची निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्यात येईल.

**निविदा प्रक्रियेबाबतचे स्पष्टीकरण -**

निविदा प्रक्रियेबाबत काही शंका अथवा तक्रारी असल्यास संबंधीत निविदाकाराने अथवा निविदा भरु इछिना-या निविदाकारंनी सदरची शंका अथवा तक्रार निविदा भरण्याच्या अंतिम दिनांक व वेळेपुर्वी किमान २ दिवस अगोदर लेखी स्वरुपात या कार्यालयाला सादर करावी. त्यानंतर आलेल्या कोणत्याही शंका अथवा तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

सही/-

**(मो. सुवेझ हक)**
**पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण**